# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/07/2023 (गुरूवार) सकाळ


### गोवंशाची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### एकुण २८,३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त
### स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची कारवाई

दिनांक ०५/०७/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पो.स्टे. कन्हान हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, जबलपूर रोड कडून नागपूर कडे ट्रक क्र. MH ३१ CB ६४९० ने काही इसम अवैधरित्या गोवंश कत्तली करीता घेऊन जात आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून दिनांक ०५/०७/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने निलज शिवार येथे नाकाबंदी करून ट्रक क्र. MH ३१ CB ६४९० ची पाहणी केली केली असता त्यात तिन इसम बसलेले दिसले व वाहनाचे पाठी मागिल डाल्यात गोवंश जातीचे २२ बैल (गोवंश) जनावरे त्यांना चारा पाण्याची सोय न करता क्रुरतेने बांधुन मिळुन आले. आरोपी नामे— १) जहुर खान साहेब खान वय ३२ वर्ष, रा. कामगार नगर नागपूर २) अब्दुल राजीक अब्दुल खालीक वय ४४ वर्ष रा. कामठी ३) फरार सह आरोपी रीजवान हाजी, रा. कामठी यांच्या ताब्यातुन १) २२ बैल (गोवंश) जनावरे एकुण किंमती ०३ लाख ३००००/—रूपयाचे २) ट्रक क्र. MH ३२ CB ६४९० किंमती अंदाजे २५ लाख रु. असा एकुण किंमती अंदाजे २८,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त गोवंशाची चारा पाण्याची व देखभाली करीता गो अनुसंधान केंद्र देवलापार येथे दाखल करण्यात आले आहे. गुन्हयातील नमुद आरोपीतांची मेडिकल तपासणी करून आरोपी व वाहनासह पो.स्टे. कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले असुन आरोपीतांविरूद्ध पोलिस स्टेशन कन्हान येथे कलम ११ (१) ड प्राणि संरक्षण कायदा, ५ (१) ब, ९ प्राणि निर्दयतेने वागविणे कायदा, १०९ भा.द.वी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास पोस्टे कन्हान करीत आहेत.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अनील राऊत, पोलीस हवालदार विनोद काळे, नाना राऊत, ईकबाल शेख, पोलीस नायक विरेंद्र नरड, पोलीस शिपाई अभिषेक देशमुख वाहन चालक मोनू शुक्ला यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर